# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- नागपूर महानगरपालिकेत नगर रचना विभागा अंतर्गत
**{सामान्य प्रशासन विभाग}** भौगोलीक माहिती (GIS Platform) प्रणालीच्या माध्यमातून विकास योजना तयार व अनुषंगीक कामाकरिता GIS Experts व GIS Assistant हे पद निवड कंत्राटी तत्वावर जाहिरात क्र. ५६८/पी.आर. दि. १८/१०/२०२३ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना करार पद्धतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार GIS Experts व GIS Assistant या पदावर प्रथमत: ६ महिन्याकरीता कार्यालयीन आदेश क्र. २९०/ओ.ॲन्ड.एम. व कार्यालयीन आदेश क्र. २९१/ ओ.ॲन्ड.एम. दि. १५/०२/२०२४ अन्वये एकमुस्त मानधन GIS Experts रू. ६८,०००/- व GIS Assistant रू. ४३,०००/- प्रतिमाह वर आदेशातील अटी व शर्ती नुसार नियुक्त करण्यात आले. उक्त आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. १४/०८/२०२४ रोजी संपूष्टात येत असल्यामुळे दि. १५/०८/२०२४ रोजी स्वातंत्र दिन असल्यामुळे व दि. १७/०८/२०२४ व १८/०८/२०२४ रोजी (शनिवार / रविवार) येत असल्यामुळे व त्यांच्या सेवेची विभागाला आवश्यकता असल्यामुळे ३ GIS Experts व ११ GIS Assistant यांना तांत्रिक खंड देवून दि. १९/०८/२०२४ पासून पुढील ६ महिन्याकरीता दि. १८/०२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रू. ४०,४५,२००/- इतका खर्च येणार असून, प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** -: सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 991/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 24/08/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत नगर रचना विभागा अंतर्गत भौगोलीक माहिती (GIS Platform) प्रणालीच्या माध्यमातून विकास योजना तयार व अनुषंगीक कामाकरिता

GIS Experts व GIS Assistant हे पद  निवड कंत्राटी तत्वावर जाहिरात क्र. ५६८/पी.आर. दि. १८/१०/२०२३ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना करार पद्धतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार GIS Experts व GIS Assistant या पदावर प्रथमत: ६ महिन्याकरीता कार्यालयीन आदेश क्र. २९०/ओ.ॲन्ड.एम. व कार्यालयीन आदेश क्र. २९१/ओ.ॲन्ड.एम. दि. १५/०२/२०२४ अन्वये एकमुस्त मानधन GIS Experts रू. ६८,०००/- व  GIS Assistant रू. ४३,०००/- प्रतिमाह वर आदेशातील अटी व शर्ती नुसार नियुक्त करण्यात आले. उक्त आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. १४/०८/२०२४ रोजी संपूष्टात येत असल्यामुळे दि. १५/०८/२०२४ रोजी स्वातंत्र दिन असल्यामुळे व दि. १७/०८/२०२४ व १८/०८/२०२४ रोजी (शनिवार / रविवार) येत असल्यामुळे व त्यांच्या सेवेची विभागाला आवश्यकता असल्यामुळे ३ GIS Experts व ११ GIS Assistant यांना तांत्रिक खंड देवून दि. १९/०८/२०२४ पासून पुढील ६ महिन्याकरीता दि. १८/०२/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रू. ४०,४५,२००/- इतका खर्च येणार असून ,प्रस्तावास मा. प्रशासक यांनी  मान्यता प्रदान केली.